# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.08.2025** **वार- बुधवार**

---

**<u>स्थापना</u>**

भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजे आज श्री गणपती बाप्पाचं घरोघरी आगमन होत असून, चैतन्यपर्वाची सुरवात होत आहे. शहरातील तसंच उपनगरांमध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळांनी स्वागत कमानी उभारल्या आहेत. मंदिरांच्या प्रतिकृतीही बनवल्या आहेत. श्रींच्या आगमनासाठी घरोघरी देखील सजावट आणि नैवेद्य दाखवण्याची तयारी सुरू आहे. बाजारातही उत्साहाचं वातावरण आहे.

पाच मानाच्या गणपतींची आणि प्रमुख गणेश मंडळांच्या श्रींची प्राणप्रतिष्ठापना शुभ मुहूर्तावर करण्यात आली. त्यासाठी श्रींच्या मूर्तीची मिरवणूक चांदीच्या पालखीतून काढण्यात आली. पारंपरिक पोशाखातील तरुण आणि तरुणींच्या नगारा, बँड, ढोल ताशा पथकांनी गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात श्रींचं स्वागत केलं. मानाचा पहिला श्री कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मानाचा दुसरा श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मानाचा तिसरा श्री गुरुजी तालीम, मानाचा चौथा श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ, मानाचा पाचवा श्री केसरीवाड्याचा गणपती आणि प्रमुख मंडळांमध्ये श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती आणि अखिल मंडई मंडळाच्या श्रींची विधिवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

**<u>पुफे</u>**

सदतिसाव्या पुणे फेस्टिव्हलच्या श्रींची प्रतिष्ठापना आज सकाळी पुणे महानगर पालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते विधिवत करण्यात आली. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य संयोजक अभय छाजेड, इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

**<u>आवाहन</u>**

पुणे शहरात नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असं आवाहन पुणे महानगरपालिकेतर्फे  करण्यात आलं आहे. नागरिकांनी नदी, तलाव अशा नैसर्गिक स्त्रोतात मूर्तींचं विसर्जन न करता अधिकाधिक प्रमाणात मूर्ती दान करावं, यासाठी महापालिकेतर्फे क्षेत्रीय कार्यालयामार्फत जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त  संदीप कदम यांनी ही माहिती दिली. सर्व क्षेत्रीय कार्यालयांना गणेशोत्सव कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक स्वच्छता राखली जाण्यासाठी सर्व सार्वजनिक ठिकाणं, रस्ते, मोकळे भूखंड, कठीण ठिकाणं, नदीपात्र, नदीघाट, विसर्जन हौदांची ठिकाणं, सार्वजनिक गणेश मंडळांचं परिसर या सर्व ठिकाणी स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**<u>पिंचिगणेश</u>**

पिंपरी-चिंचवडमध्ये पारंपरिक विसर्जन सोहळ्याच्या वेळी शहरातील नदीकाठ, तलाव आणि कृत्रिम जलकुंडांवर अनेकदा प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल, सजावटीचं साहित्य आणि इतर विघटन न होणारा कचरा थेट पाण्यात किंवा नदीकाठावर टाकला जातो. यामुळं जलप्रदूषण वाढून पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचं वारंवार दिसून येतं. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं नागरिकांना नदीकाठावर कुठल्याही प्रकारचा प्लास्टिक कचरा अथवा विघटन न होणारं साहित्य टाकू नये असं आवाहन केलं आहे. यासाठी प्रत्येक विसर्जन स्थळी निर्माल्य संकलनासाठी विशेष कुंड्या ठेवण्यात आल्या असून, फुले, माळा, पूजेचं साहित्य आणि इतर जैविक कचरा केवळ या कुंड्यांमध्येच टाकावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>प्रसाद</u>**

गणेशोत्सवात प्रसाद स्वतः तयार करून भाविकांना वितरित करणाऱ्या गणेश मंडळानी पुणे अन्न आणि औषध प्रशासन कार्यालयाकडे नोंदणी करुन प्रमाणपत्र घ्यायचं आहे. तसंच कच्च्या अन्न पदार्थांची खरेदीची बिलं जपून ठेवावीत. कच्चे अन्नपदार्थ परवानाधारक दुकानातूनच खरेदी करावीत, असं आवाहन पुणे अन्न आणि औषध प्रशासनाचे सहआयुक्त सुरेश अन्नपुरे यांनी केलं आहे. गणेश मंडळांनी भाविकांसाठी तयार केलेला प्रसाद काचेच्या भांड्यात किंवा पारदर्शक प्लॅस्टीकच्या भांड्यात झाकून ठेवावा. या प्रसादाला धूळ, माती, माशा, मुंग्या या इतर किटकांचा प्रादुर्भाव होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. तसंच भाविकांना शिळे अन्नपदार्थ सेवनास देऊ नयेत, अशा सूचनाही अन्न आणि औषध प्रशासन विभागानं दिल्या आहेत.

**<u>कान्हेरी</u>**

कन्हेरी परिसरात शिवसृष्टीमुळं पर्यटकांना इतिहासाची ओळख आणि त्यातून प्रेरणा मिळेल. तसंच बारामतीचं सांस्कृतिक आणि पर्यटन महत्त्व अधिक वाढेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज बारामती परिसरातील विविध विकास कामांची पाहणी केल्यानंतर व्यक्त केला. शिवसृष्टी, कन्हेरी वन उद्यान परिसर, तांदुळवाडी इथला वृद्धाश्रम तसंच तिरंगा चौकाची पाहणी करून त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

**<u>रुग्णालयं</u>**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांची संख्या वाढविण्यात येणार आहे. रुग्णालयांची खाटांची क्षमता, मनुष्यबळ, आवश्यक कागदपत्रं यांच्या तपासणीसाठी विशेष पथक स्थापन केलं आहे. यामध्ये बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहयोगी

प्राध्यापकांचा समावेश आहे. तपासणी पथकानं पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील 14 रुग्णालयांच्या पाहणीला सुरुवात केली आहे.

**<u>तृतीयपंथी</u>**

पुणे महापालिकेत नोकरी करणाऱ्या तृतीयपंथी सुरक्षा रक्षकांच्या निवासी धोरणाला महापालिका आयुक्तांनी तत्वत: मान्यता दिली आहे. लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार असून सेवकांना ही घरं मोफत दिली जाणार आहेत अशी माहिती सुरक्षा अधिकारी राकेश विटकर यांनी दिली. महापालिकेत २५ तृतीयपंथी कामावर घेण्यात आले आहेत. या सेवकांच्या राहण्याचा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात होता.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**